**ठळक बातम्या**

- मराठी न येणाऱ्या रिक्षा आणि टॅक्सी चालकांवर कुठलीही कारवाई न करण्याचा राज्य सरकारचा निर्णय

- नाशिकमधल्या वृक्षतोडीला हरित लवादाची स्थगिती कायम

- ईडीच्या कारवाईत 'रिलायन्स अनिल अंबानी ग्रुप'च्या ३ हजार ३४ कोटी रुपयांच्या मालमत्तेवर टाच

**आणि**

- राष्ट्रकुल युवा आणि कनिष्ठ गट भारोत्तोलन स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी पटकावली चार सुवर्णपदकं

**<><><><><>**

मराठी न येणाऱ्या रिक्षा आणि टॅक्सी चालकांवर कुठलीही कारवाई न करण्याचा किंवा त्यांचा परवाना रद्द न करण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. मात्र मराठी सक्तीच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी १ मे ते १५ ऑगस्ट दरम्यान विशेष पडताळणी मोहिम राबवली जाईल, अशी घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केली आहे. परिवहन विभागातल्या अधिकाऱ्यांची बैठक घेतल्यावर ते आज मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते. मराठी प्रशिक्षणासाठी अतिरिक्त परिवहन आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली चार सदस्यीय समिती स्थापन केली जाईल, ही समिती ज्यांना मराठीत संवाद साधता येत नाही त्यांची नोंद ठेवेल, असं सरनाईक यांनी सांगितलं. तसंच ज्यांना मराठी शिकण्याची इच्छा आहे, त्यांना आरटीओ कार्यालयात जागा उपलब्ध करून दिली जाईल, पुस्तकं उपलब्ध करून दिले जातील असं परिवहन मंत्र्यांनी यावेळी सांगितलं.

**-- होल्ड बाईट सरनाईक - -**

या कालावधीत बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्या, प्रवाशांची फसवणूक करणाऱ्या, तसंच नियमांचं उल्लंघन करणाऱ्या चालकांवर कारवाई केली जाईल, त्यांचा परवानाही रद्द केला जाऊ शकतो असं सरनाईक यांनी स्पष्ट केलं.

**<><><><><>**

नाशिक शहरातल्या वृक्षतोडीच्या मुद्द्यावर हरित लवादानं यापूर्वी दिलेली स्थगिती कायम ठेवली आहे. नाशिक मध्ये कुंभमेळ्याच्या कामांसाठी मोठ्या प्रमाणात वृक्षतोड करण्यात येत असून यासंदर्भात मनीष बावीस्कर यांनी अर्ज दाखल केला होता. त्यावर दिलेला स्थगिती आदेश मागे घेण्याची मागणी नाशिक महानगरपालिकेनं केली होती, मात्र हरित लवादानं ती फेटाळून लावत १९ जूनपर्यंत वृक्षतोडीवरची बंदी कायम ठेवली.

शहरातल्या धोकादायक, किंवा कोसळण्याची शक्यता असलेल्या झाडांबाबत आपत्कालीन परिस्थितीत झाड तोडणं किंवा छाटणीसाठी परवानगीची तरतूद स्थगिती आदेशात समाविष्ट करण्याची विनंती महानगरपालिकेनं केली. यावर लवादानं, अशा आपत्कालीन प्रकरणांत स्वतंत्र अर्ज करून परवानगी मागता येईल, एवढीच मुभा दिली.

**<><><><><>**

उत्तर प्रदेशात वाराणसी इथे सुमारे ६ हजार ३५० कोटी रुपये खर्चाच्या विविध विकास प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज झाली. या प्रकल्पांमध्ये रेल्वे, रस्ते, जलव्यवस्थापन, आरोग्यसेवा, पर्यटन आणि शहरी पायाभूत सुविधा यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांचा समावेश आहे. या वेळी प्रधानमंत्र्यांनी महिला संमेलनातही सहभाग घेतला. दोन नवीन अमृत भारत एक्सप्रेस रेल्वेगाड्यांना हिरवा झेंडा दाखवून त्यांनी रवाना केलं. या 'अमृत भारत एक्सप्रेस' गाड्या बनारस-हडपसर, पुणे आणि अयोध्या-लोकमान्य टिळक टर्मिनस मुंबई दरम्यान धावतील. या प्रसंगी मोदी म्हणाले…

**होल्ड.. बाईट - नरेंद्र मोदी**

तसंच गंगेवरच्या रेल्वे-सह-रस्ते पुलाच्या बांधकामाचा समावेश असलेल्या 'वाराणसी - पंडित दीनदयाल उपाध्याय जंक्शन' दरम्यानच्या तिसऱ्या आणि चौथ्या रेल्वे मार्ग प्रकल्पाची पायाभरणीही त्यांनी केली. या दौऱ्यात उद्या हरदोई इथे गंगा एक्सप्रेस वेचं उद्घाटन प्रधानमंत्र्यांच्या हस्ते होणार आहे.

<><><><><>

देशातल्या नागरिकांना आणि करदात्यांना सुलभ व्हावं, त्यांची सोय व्हावी यासाठी नवीन आयकर कायदा अंमलात आला असल्याची माहिती आयकर विभागाचे मुख्य आयुक्त विक्रम सहाय यांनी आज मुंबईत दिली. नवीन आयकर कायद्याविषयी जनजागृती करण्यासाठी घाटकोपरमध्ये आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. आयकर कायदे आणि आयकर यंत्रणा यात सुधारणा कारणासाठी सरकार वचनबद्ध आहे, असं आश्वासन त्यांनी यावेळी दिले. नवीन आणि जुने आयकर कायद्याविषयी त्यांनी यावेळी उपस्थित व्यापारी, करदाते, कर सल्लागार यांच्या शंकांचे निरसन केले.

<><><><><>

कोल्हापूरातले प्रकाशक प्रशांत आंबी यांना बुलढाणा पोलिसांनी स्थानबद्ध केलं आहे. आमदार संजय गायकवाड यांनी शिवीगाळ तसंच धमकी दिल्याच्या निषेधार्थ बुलढाणा इथं ते आंदोलन करत होते. भारतीय कम्युनिस्ट पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट तसंच इतर पुरोगामी संघटनांचे कार्यकर्ते सकाळीच बुलढाण्यामधे जिजामाता मैदानावर एकत्र जमले. दुसरीकडे संजय गायकवाड यांचे समर्थकही मोठ्या संख्येने या ठिकाणी जमल्यामुळे दोन्ही बाजूंनी घोषणाजी सुरू होऊन तणावाचं वातावरण निर्माण झालं, त्यामुळे पोलिसांनी आंदोलकांना ताब्यात घेऊन स्थानबद्ध केलं आहे.

<><><><><>

मनी लॉन्ड्रींग प्रकरणी ‘रिलायन्स अनिल अंबानी ग्रुप’ कंपन्यांविरोधात सुरु असलेल्या चौकशीचा भाग म्हणून, ईडी, अर्थात सक्तवसुली संचालनालयानं आज केलेल्या आणखी एका कारवाईत ३ हजार ३४ कोटी रुपयांच्या मालमत्तेवर टाच आणली. जप्त केलेली मालमत्ता रिलायन्स कम्युनिकेशन्स आणि रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड, या कंपन्यांच्या मालकीची असल्याचं संबंधित सूत्रांनी सांगितलं.

रिलायन्स अनिल अंबानी ग्रुप विरोधात केलेल्या कारवाईत आतापर्यंत जप्त केलेल्या मालमत्तेची एकूण किंमत १९ हजार ३४४ कोटी रुपयांवर पोहोचली आहे. बँक फसवणूक आणि निधीचा अपहार केल्याच्या आरोपांखाली ही चौकशी सुरू आहे.

**<><><><>**

सामोआ इथे सुरू असलेल्या राष्ट्रकुल युवा आणि कनिष्ठ गट भारोत्तोलन स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी आज चार सुवर्णपदकं पटकावली. पुरुषांच्या ६५ किलो वजनी गटात सुनील सिंग याने २७१ किलो वजन उचलून सुवर्णपदक जिंकलं. अभिनोब गोगोई याने ७१ किलो वजनी गटात एकूण २८४ किलो वजन उचलून सुवर्णपदकावर नाव कोरलं. चारू पेसी याने पुरुषांच्या ६५ किलो वजनी गटात सुवर्ण पदक पटकावलं तर महिलांच्या ५८ किलो वजनी गटात १८५ किलो वजन उचलून ऐसांगफा गोगोई हिने सुवर्णपदक मिळवलं.

**<><><><>**

थॉमस अँड उबर चषक बॅडमिंटन स्पर्धेत भारतीय महिला संघाला चीनपुढं ५-० नं पराभव पत्करावा लागला. या पराभवामुळे भारताचं या स्पर्धेतलं आव्हान संपुष्टात आलं आहे. महिला एकेरीत पी. व्ही. सिंधु हिला वांग झियी हिच्याकडून १६-२१, २१-१९, १९-२१ असा पराभव पत्कारावा लागला. प्रिया कोन्जेंगबाम आणि श्रुती मिश्रा या जोडीचा लियू शेंग शू आणि टॅन निंग या जोडीने ११-२१, ८-२१ अशा

गुणांनी पराभव पत्करावा केला. ट्रिसा जॉली आणि कविप्रिया सेल्वम या जोडीचा लुओ झू मिन आणि झांग शू शियान या जोडीने १०-२१, २१-१२, १९-२१ केला.

**<><><><>**

मुंबईत येत्या १५ मे पासून १० टक्के पाणीकपात लागू होणार आहे. मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्त अश्विनी भिडे यांनी आज ही माहिती दिली. मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सातही धरणांमध्ये उपलब्ध असलेला पाणीसाठा येत्या १७ जुलैपर्यंतच पुरेल इतका आहे. तसंच एल निनोमुळे यंदा पावसाचा निश्चित अंदाज वर्तवता येत नाही. त्यामुळे पाण्याचं आगाऊ नियोजन म्हणून ही पाणीकपात लागू होणार असल्याचं त्या म्हणाल्या. ठाणे, भिवंडी महानगरपालिका हद्द आणि परिसरातल्या गावांनाही या पाणी कपातीची झळ बसणार आहे.

**<><><><>**

सोलापूर जिल्ह्यातल्या बार्शी इथल्या १२ व्या शतकातल्या हेमाडपंथी शैलीतल्या भगवान विष्णू मंदिराचा विकास आराखडा प्रशासनाकडे सादर झाला आहे. हा आराखडा राज्य शिखर समितीकडे आल्यानंतर त्यात प्रस्तावित कामांना सरकार मंजुरी देईल आणि निधी देईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज दिली. श्री भगवंत प्रकट दिनानिमित्त या मंदिरात झालेल्या धार्मिक कार्यक्रमात मुख्यमंत्री सहभागी झाले होते. त्यानंतर बार्शी शहरात प्रधानमंत्री आवास योजना आणि रमाई आवास योजनेअंतर्गत घरकूल लाभार्थ्यांना त्यांच्या हस्ते घराच्या किल्ल्या देण्यात आल्या.

**भाजपाच्या** सोलापूरातल्या नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार सोहळा आज फडनवीस यांच्या उपस्थितीत झाला. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत भाजपाला चांगलं यश मिळालं असल्यामुळे जनतेच्या विश्वासाला पात्र ठरू असं काम करावं अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी यावेळी पदाधिकाऱ्यांना दिल्या. सोलापूरच्या आयटी पार्कची जागा हस्तांतरित झाली आहे. लवकरच या ठिकाणी सुसज्ज

इमारत उभी करून सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून दिला जाईल, शहरात रेडीमेड कपड्याचं गारमेंट पार्क उभं केलं जाईल, अशी आश्वासनं त्यांनी दिली.

<><><><>

जनगणनेच्या प्रक्रियेला गती देण्यासाठी राज्यभरात विशेष जनजागृती मोहीम राबवण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर मुंबईत मंत्रालयातल्या त्रिमुर्ती प्रांगण परिसरात जनगणनेसंदर्भात माहितीपर फलक लावले आहेत. या उपक्रमाबाबत अतिरिक्त मुख्य सचिव आणि राज्य नोडल अधिकारी सीमा व्यास यांच्या अध्यक्षतेखाली आज बैठक झाली, यात जनजागृती मोहिमेचं नियोजन करण्यात आलं. जनगणनेबाबत जागरूकता निर्माण करणं आणि नागरिकांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करणं हा या मोहिमेचा उद्देश आहे.

<><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज पंजाब किंग्ज आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात सामना होणार आहे. न्यू चंदिगडमधे पंजाब क्रिकेट असोसिएशनच्या मैदानावर थोड्याच वेळात, साडे सात वाजता हा सामना सुरु होईल.

राजस्थान रॉयल्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

<><><><>

गेल्या २४ तासात विदर्भात काही ठिकाणी तर कोकण, मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी कमाल तापमानात लक्षणीय तर मराठवाड्यात किंचित वाढ झाली. राज्यात सर्वाधिक तापमान अमरावती इथं ४६ पूर्णांक ६ दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसात मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. या काळात विदर्भात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता आहे. कोकणात हवामान कोरडं राहील.

**//<><><><><>//**